# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर
### माहिती कक्ष, दिनांक २३ जुलै

### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ४८१/२०१७ भादंविसक ३८८,५०४,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | २१/०७/२०१७ रोजी १९.०० वाजता चे दरम्यान, फिर्यादीचे घरा समोर,रा. हौसे वस्ती,अमराई,सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २२/०७/२०१७ रोजी २०.३० वाजता. |
| **फिर्यादी** | : | अमोल ऊर्फ रॉकी अभिमन्यु बंगाळे,वय ३२,रा. सदर |
| **आरोपीचे नांव** | : | महेश ऊर्फ आप्पा दिनकर बंगाळे,रा. सदर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील अरोपी हा फिर्यादीस सेंट्रींगचे कामासाठी १,५०,०००/-रु. मागणी करित होता.परंतु फिर्यादीने त्यास पैसे देण्यासाठी नकार दिल्याचा राग मनात धरुन ,आरोपी हा फिर्यादीच्या घरात येवुन तुझ्यावर एकदा केस करून समजले नाही,गप मुकाटयाने पैसे दे,आता कमीशन्र साहेब नवीन आले आहेत,पुन्हा तुझ्या विरुध्द खोटी तक्रार करेन,मी किंवा माझी आई तुझ्या घरा समोर रॉकेल ओतुन पेटवुन घेवुन आत्महत्या करेन,फिर्यादी व फिर्यादीच्या भावाने पैशासाठी अडवणुक करून,मारहाण करून जबरदस्तीने पैसे काढुन घेतले.असे म्हणुन पुन्हा गुन्हा दाखल करेन तुझी समाजात बदनामी करीन व तु पुन्हा ईलेक्शनला तरी कसा उभा राहशील अशी धमकी दिली.तसेच नमुद अरोपी हा फिर्यादीचा आते भाऊ अमर नागनाथ परकाळे यास भेटुन त्यास रॉकीला मला सेंट्रींग कामासाठी १,५०,०००/-रु दे नाही तर स्वता:ला काहितरी बरेवाईट करून घेवुन त्याचे विरुध्द खोटी तक्रार करेन अशी धमकी दिली म्हणुन.तपास:- सपोनि/चव्हाण. |

### सदरबझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ४६९/२०१७ भादंविसक ३८०,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | १८/०७/२०१७ रोजी पहाटे ०५.०० वा चे सुमारास,फिर्यादी चे राहते घर,घर नं.२,सिरत नगर,कुमठा नाका,सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २२/०७/२०१७ रोजी १९.०२ वाजता. |
| **फिर्यादी** | : | अहद शब्बीर काझी,वय ४२,रा. सदर |
| **आरोपीचे नांव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ३८,४००/-रु. रोख रक्कम,सोन्याचे मंगळसुत्र,व एक मोबाईल |

| | | |
|---|---|---|
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीच्या घराचा दरवाजा व गेट अर्धवट उघडे असलेले ढकलुन आत प्रवेश करून,फिर्यादी बेडरुम मध्ये झोपले असताना,रात्री टेबलावर ठेवलेले मंगळसुत्र,पाकीट मधील रोख रक्कम व मोबाईल हा कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमत्तीशिवाय मुद्दाम लबाडीने, चोरून नेले म्हणुन.तपास:- पोसई/गोडसे. |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | ४४३/२०१७ भादंविसक ३५३,५०४,५०६,प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | २२/०७/२०१७ रोजी १६.५० वाजता चे दरम्यान, हनुमान मंदिर जवळ,जुना विजापूर नाका,झोपडपट्टी नं.२,सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २२/०७/२०१७ रोजी २३.२१ वाजता. |
| **फिर्यादी** | : | पोशि/२४७/लक्ष्मीकांत विश्वनाथ निरंजन,नेम.विजापूर नाका पोलीस ठाणे, सोलापूर शहर. |
| **आरोपीचे नांव** | : | महेश चिमाजी मेटकरी,वय ४०,रा. सदर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी विरुध्द फिर्याद दाखल असल्याने,त्यास फिर्यादी व फिर्यादीचे सहकारी पोशि/१९२/गायकवाड असे मिळुन शासकिय मोटार सायकल नं. एमएच/१३/एडी/९०६०,या वरुन नमुद आरोपी याचे राहते घरी येवुन नमुद आरोपीस आमचे सोबत आयटीआय पोलीस चौकी येथे चल,तुझ्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.असे सांगत असताना नमुद अरोपी यांने मी तुमच्या बरोबर येणार नाही,तुम्हाला काय करायचे ते करा,अशी आरेरावीची भाषा करू लागल्याने,फिर्यादी हा त्याला आमचे बरोबर चौकीत येण्या करिता समजावुन सांगत असताना,नमुद आरोपी यांने फिर्यादीच्या अंगावर धावुन येवुन फिर्यादीच्या अंगावरील सरकारी गणवेषांचे शर्टाची गच्ची पकडुन,फिर्यादीस तुला बघुन घेतो,तुझी नौकरी घालवितो,मी खुप वेढा माणुस आहे.माझ्यावर असे खुप गुन्हे,तुमच्या पोलीस स्टेशनला दाखल आहे,असे म्हणुन शिवीगाळ व दमदाटी करून,फिर्यादीच्या अंगावरील कॉलर पकडुन,झोंबाझोंबी करून, घाणघाण शिवीगाळ,दमदाटी करू लागल्याने,फिर्यादीचे सहकारी पोशि/१९२/गायकवाड,यांनी सोडवित असताना,त्यांच्या ही अंगावर धावुन जावुन सरकारी कामात अडथळा केला म्हणुन.तपास:- पोना/५०/भालशंकर |

## सलगर वस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरन. व कलम** | : | १५४/२०१७ मुं.प्रो.का.क.६५(फ),प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | २२/०७/२०१७ रोजी १३.४० वाजता चे दरम्यान, कवटे गांव गोविंद तांडा,सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | २२/०७/२०१७ रोजी १६.४५ वाजता. |

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | : | पोशि/१३०३/अनिल शिवलिंग गवसाने,नेम.सलगर वस्ती, पोलीस ठाणे, सोलापूर शहर. |
| **आरोपीचे नांव** | : | बाबु सुभाष राठोड,रा. सदर |
| **मिळाला माल** | : | १६,५००/- रु. ४०० लि.गुळ मिश्रीत रसायन. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की बाजुस नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी हा वरील वर्णनाचे व किमंतीचे .गुळ मिश्रीत रसायन हे बिगर पास बीगर परवानाने हा.भ.दारु ची भट्टी चालु करून,आपले कब्जात बाळगलेल्या स्थितीत मिळुन आला असुन,तो पोलीसांना पाहुन पळुन गेला.तपास:- पोना/१३९१/कांबळे. |

**सोलापूर पोलीस आयुक्तालय शहर करिता.**